ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
July – December 2022- Vol. 11 No. 2

# हैद्राबाद स्वातंत्र लढयातील वीर हूतात्मा जयवंतराव पाटील यांचे योगदान

**डॉ. किशन केंद्रे**

*इतिहास विभाग प्रमुख,*
*लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड*
*ता. लोहा जि. नांदेड.*

**प्रस्तावना**

*नांदेड जिल्हयाच्या हादगांव तालुक्यातील वायपनाचे शूर स्वातंत्र्य सेनानी जयवंतराव पाटील यांनी हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात मोठे योगदान दिले आहे. हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाचे नेतृत्व हैदराबाद स्टेट कॉंग्रेसने केले. हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली झालेल्या लढयात जयवंतराव पाटील यांनी सहभाग नोंदवला. ब्रिटिश भारतात जवळपास 563 देशी संस्थाने होती. या संस्थानाचा राज्यकारभार देशीराजे करीत असत त्यानांच संस्थानिक असे म्हटले जात असे. दक्षिण भारतात त्रावणकोर, बडोदा, कोल्हापूर, नागपूर, हैदराबाद ही संस्थाने अस्तित्वात होती. दक्षिणेचा सुभेदार मीर कमरुद्दीन निजाम उल–मुल्क होता. त्यानेच देशातील राजकीय अस्थिर आणि मोगल सम्राटांच्या दुर्बलतेचा फायदा घेउन 31 जुलै 1724 रोजी दक्षिण भारतात राज्याची स्थापना केली. या राज्याची राजधानी हैदराबाद होती. या संस्थानाच्या गादीवर वंशपरंपरेने होउन गेलेल्या सत्ताधिशांना निजाम व आसफजाह या नावाने ओळखले जाते. हैदराबाद राज्यात मराठवाडा तेलंगणा व कर्नाटक या प्रादेशिक विभागाचा समावेश होतो.*

## हैदराबाद राज्याची स्थापना

इ.स. 1526 मध्ये बाबर यानी दिल्ली येथे मोगल घराण्याची सत्ता स्थापन केली. पुढे मोगल घराण्याचा विस्तार होवून त्यांचे रुपांतर साम्राज्यात झाले. इ.स. 1599 मध्ये मोगल सम्राट अकबरने अहमदनगरच्या निजामाचे राज्य जिंकून घेतल्यामुळे मोगलांचा दक्षिणेत प्रवेश झाला. मोगलांनी हळूहळू संपूर्ण दक्षिण भारतावर वर्चस्व निर्माण केले. मोगल काळात प्रशासनाच्या सोयीसाठी दक्षिण भारताची खानदेश, व–हाड, औरंगाबाद, बिदर, विजापूर, हैद्राबाद या सहा सुभ्यात सुभ्याचे विभागणी केली. वरील सहा मुख्यालय मराठवाडयातील औरंगाबाद येथे होते. या सहा सुभ्याचा कारभार पाहण्यासाठी मोगल बादशहाकडून एका सुभेदाराची नियुक्ती केली जात असे. त्यालाच दक्षिणेचा सुभेदार असे संबोधले जाई. मोगल सम्राट फर्रुखशियर याने इ.स. 1713 मध्ये मीर कमरुद्दीन निजाम उल–मुल्क फिरोज जंगखान खानान चिन कुलीजखान यांची दक्षिणेचा सुभेदार म्हणून नेमणूक केली. औरंगजेबच्या मृत्यूनंतर सत्तेवर आलेले मोगल सम्राट दुर्बल निघाले. त्याचा फायदा घेवून दक्षिणेचा सुभेदार मीर कमरुद्दीन याने 31 जुलै 1724 रोजी दक्षिणेत स्वतंत्र राज्याची स्थापना केली. या राज्याची पाहिली राजधानी मराठवाडयातील औरंगाबाद होती. यानंतर पुढे तेलंगणातील हैदराबाद है राजधानीचे ठिकाण होते.

## हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम म्हणजे काय

ब्रिटिशांनी भारतीयावर अन्याय व अत्याचार करण्यास सुरुवात केली. त्यामुळे अन्यायी सत्ता नष्ट करण्यासाठी भारतीयांनी इग्रजांविरुध्द स्वतंत्र युध्द पुकारले. शेवटी इग्रजांनी स्वातंत्र कायदा जुलै 1947 मध्ये पास करुन भारताला 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वातंत्र दिले. भारतीय स्वातंत्र्य कायदानुसार संस्थाना भारतात सामील व्हायचे की पाकिस्तानात सामील व्हायचे की स्वातंत्र्य रहावयाचे या बाबतचे स्वातंत्र्य संस्थानिकांना दिले होते. त्यामुळे संस्थानाच्या विलीनीकरणांचा प्रश्न निर्माण झाला. भारतीय स्वातंत्र्य कायद्यानुसार हैदराबादच्या निजामाने स्वतंत्र राहणार असल्याचे जाहीर केले. भारताचे पंतप्रधान पंडित नेहरु व गृहमंत्री सरदार वल्लभाई पटेल यांनी बहूतेक संस्थाने भारतात विलीन करुन घेतली. परंतु हैदराबादच्या निजामाने संस्थान स्वतंत्र राहणार असल्याचे घोषित केल्यामुळे भारत सरकार समोर मोठा प्रश्न निर्माण झाला. देशाच्या मध्यभागी आणि देशात आकाराने दुस–या क्रमांकाचे असलेले हैदराबाद राज्य स्वतंत्र राहणे जनतेच्या नव्हे देशाच्या हिताचे नव्हते. तसेच हैदराबाद संस्थान भारतातील विलीनीकरण शिवाय भारताच्या स्वातंत्र्याला पूर्णत्व प्राप्त होणार नव्हते. त्यामुळे संस्थानातील जनतेने हैदराबाद संस्थानाचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करण्यासाठी सत्याग्रह व सशस्त्र आंदोलन केले. शेवटी 13 सप्टेंबर 1948 रोजी भारत सरकारने हैदराबाद राज्यावर लष्करी कारवाई करुन ते भारतीय संघराज्यात विलीन करुन घेतले. हैद्राबाद संस्थानच्या विलीनीकरणासाठी जनतेने जे आंदोलन केले. हेच आंदोलन भारतीय इतिहासात हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम या नावाने ओळखले जाते. हा स्वातंत्र्य संग्राम भारतीय स्वातंत्र आंदोलनाचाच एक भाग होता.

### हैदराबाद स्टेट कॉंग्रेसची स्थापना

हैदराबाद संस्थानातील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी एक राजकीय व्यासपीठ म्हणजे राजकीय संघटना असणे आवश्यक होते. हा विचार बळावत गेला. त्यामुळे स्वामी रामानंद तीर्थाच्या प्रेरणेने आणि महाराष्ट्र परिषेदच्या पुढाकाराने इ.स. 1937 मध्ये कर्नाटक परिषद, आंध्र महासभा आणि महाराष्ट्र परिषदेचे एकीकरण झाले. या तिन्ही परिषदाच्या एकीकरणासाठी या तिन्ही परिषदाच्या नेत्यांची बैठक हैदराबाद येथे झाली होती. 1 आणि 2 जुन 1938 रोजी महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन लातूर येथे संपन्न झाले. या अधिवेशानात स्वाजीनीना त्यांनी महाराष्ट्र परिषदेचे सरचिटणीस व्हावे असे सुचविले होते. याच अधिवेशनात नागरीक स्वातंत्र्यासाठी एक समिती नेमली होती. या समितीचे संयोजक स्वामी रामानंद तीर्थ होते. लातूर येथील महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनाच्या आदेशानुसार स्वामीजीनी अंबाजोगाई सोडले आणि हैदराबाद येथे राहण्यासाठी गेले. हैदराबाद येथे स्वामीजीना तेथील एखाही नावाजलेल्या पुढा–याने राहण्यासाठी आधार दिला नाही. रंगराव मुन्सफ उर्फ रंगराव रत्नाळीकर यानी स्वामीजीना आधार दिला. त्यांच्या एका खोलित स्वामीजी राहू लागले. स्वामीनी बरोबर आनंद कृष्ण वाघमारे आणि दिगंबरराव बिंदू हे दोघे असत. संपूर्ण हैदराबाद संस्थानासाठी एक राजकीय संघटना कायम असली पाहिजे हा त्यांचा विचार होता.

याच सुमारास हैदराबाद मधील नेत्यांनी 29 जुन 1938 रोजी हैदराबाद येथे काशिनाथराव वैद्य यांच्या घरी बैठक घेवून हैदराबाद स्टेट कॉंग्रेस या संघटनेची स्थापना केली. या बैठकीस स्वामीजीना आणि आंध्र आणि मराठवाडयातील जहाल नेत्यांना मात्र बोलविण्यात आलेले नव्हते. या बैठकीतील सर्व नेते मवाळ विचारसरणीचे आणि सरकारवर विश्वास ठेवणारे होते. याच बैठकीत एक अस्थायी समितीची निवड करण्यात आली. सयोजक म्हणून रामकिशन धूतची निवड करण्यात आली. या समितीचे सदस्य म्हणून पाडूरंग जोशी, जी रामाचार्य, हनुमंतराव माडपाटी, सयद रिराजल, हसन तिरमिजी बी, बी रामकृष्णराव याची निवड करण्यात आली. अस्थायी समितीचे सदस्य म्हणून श्रीधर वामन नाईक, हरिलाल वाघरे, रवि नारायण रेड्डी, गोविंदराव नानल, हरिचंद्र हेडा, जनार्दनराव देसाई यांना संलग्न करुन घेतले. याच बैठकीत असे ही ठरविण्यात आले की, 9 सप्टेंबर 1938 रोजी संस्थानाची बैठक घेवून रितसर कार्यकारी मंडळाची निवड करावी. ही आमसभा हैदराबाद शहरात जी रामाचारी यांच्या बंगल्यावर होणार होती. या आमसभेत कॉंग्रेसच्या कार्यकारी मंडळाची रितसर निवड करण्यात येणार होती. दरम्यान काळात नोंदणी करण्यात आली. जी रामाचारी हे सरकारचे विश्वासू असल्याने त्यांना विचारल्याशिवाय सरकार स्टेट कॉंग्रेसच्या विरोधात काहीही करणार नाही अशी मवाळवाद्याची भ्रामक कल्पना होती. परंतु सरकारने स्टेट कॉंग्रेसच्या स्थापनेपूर्वीच पब्लिक सेफटी रेग्युलेशन या कायद्याने बंदी घातली. जी रामाचारी यांच्या बंगल्यावर हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या स्थापनेची घोषणा करण्यासाठी 9 सप्टेंबर 1938 जी सभा बोलविण्यात आली होती. ती आमसभा बेकायदेशीर असल्याचे सरकारने कॉंग्रेसच्य अस्थायी समितीला कळविले. तेथूनच निजाम सरकारच्या विरोधात कॉंग्रेसने सत्याग्रहाचे पर्व सुरु केले. निजाम सरकारच्या विरोधात केलेले झेंडा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, आणि सशस्त्र आंदोलन उल्लेखनिय ठरते. निजामाचा मुकाबला करण्यासाठी अनेक तरुण मैदानात उतरले, प्रत्यक्ष लढा दिला. यात काही हूतात्मे झाले, यात थोर हुतात्मा जयवंतराव पाटील यांचे योगदान उल्लेखनिय ठरते.

आष्टी प्रकरण

हादगांव तालुक्यातील तामसा या गावपासून पाच मैल अंतरावर असलेले वायपना हे हूतात्मा जयवंतराव पाटील यांचे मुळे गांव होय. निजामाची अन्यायी सत्ता उलथून टाकण्यासाठी वायपना हे गांव म्हणजे त्या पंचक्रोशितले एक महत्वाचे शक्तीकेंद्र होते. जयतंवरात पाटीलांचे वडिल विक्रसिंह हे धाडसी व पराक्रमी होते. त्यांनी निजाम सत्तेविरुध्द संघर्ष केला होता. म्हणून विक्रमसिंहाना काही काळ कारावासाची शिक्षा भोगावी लागली होती. अन्यायाविरुध्द लढा देणे, अन्याय सहन न करणे, सत्याची बाजू घेणे व मांडणे आणि हाती घेतलेले कार्य पूर्णत्वास नेणे, अशी या घराण्याने आपली परंपरा कायम राखली. असा लढा वृत्तीचा वारसा पुढे जोमाने नेण्याचे काम जयवंतरावाने केले. बालपणापासूनच अंगी धाडसी गुण असल्यामुळे निजामी सत्तेला आणि त्यांच्या लष्करांना ते कधीच घाबरले नाहीत. ते अन्यायी सत्तेचा तिरस्कार करीत कोणतेही धाडसी कामे उत्साहाने करीत, एखाद्या निर्णय घेतला की तो तडीस नेत असत, असे गुण बालपणापासून त्यांच्या अंगी होते. जयवंतराव पाटील यांना भजनाची आवड त्या निमित्ताने गावोगावी जाउन तरुणांना संघटीत करीत असत. अन्यायी सत्तेविररुध्द नवजागृतीची ज्योत पेटवत असत. ग्रामीण भागातील तरुणांमध्ये जुलमी निजामी राजवटी विरुध्द दंड थोपटले पाहिजे अशी चेतावनी देत.

जयवंतरांवानी स्वतःला झोकून देवून कोळगांव कंजारा, पाथ्रड, तळेगांव धर्माबाद, चिकना, उमरी, निवघा, इ. ठिकाणी जावून तेथील तरुणांनात जनजागृती निर्माण

केली. निजामाविरुध्द बंड करण्याची चेतावणी देवून स्वातंत्र्याची ईर्षा उत्पन्न केली. जयवंतरावाच्य चेताणीमुळे सर्व परिसरातील तरुण संघटीत होत होते.

निजामधर्मिणे रझाकारांनी राज्यात धुमाकूळ घातला. हिंदूच्या कत्तली करण्यात आल्या. स्त्रियांवर अत्याचार करण्यात आले. त्यांच्य अब्रु लुटण्यात आल्या. हिंदू ची घरे लुटली रझवी वाटेल त्या वल्गना करु लागला. जयवंतरावानी रझाकारांचा बंदोबस्त, करण्याच्या निर्णय घेतला. संघर्ष केल्याशिवाय अन्याय थांबणार नाही, याची जाणीव जयवंतरावाना होती. त्यांनी भजनानिमित्त गावोगावी जाउन जुलमी सत्तेविरुध्द लढण्यास वातावरणनिर्माण केले. निजाम सत्तेविरुध्द जलदगतीने बंड करण्यासाठी परिसरातील तरुणांची वायपना येथे स्वतःच्या घरी बैठक घेण्यात आली. या बैठकीस स्वातंत्र इर्षेने पेटलेले तरुण मोठया प्रमाणात उपस्थित होते. या बैठकीत जुलमी निजाम सरकार विरुध्द आंदोलन करण्यासाठीचे ठोस पावले उचलली. निजाम सरकारने आपले राज्य टिकून ठेवण्यासाठी दडपशाही सुरु केली. त्यांनी गावोगावी रोहिले पाठवून धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. निजाम सरकार विरोधात आवाज उठविणा—यांना संपून टाकण्याचा कायदा अंमलात आणला. ज्या गावांत निजाम सरकार विरुध्द कार्यवाही सुरु आहे, तेथे रोहिले जावून गांवक—यांचे मनसुबे चिरडून टाकत असत.

जलालखान या निजामाच्या रोहिल्यांनी आष्टीच्या परिसरात दहशत निर्माण केली होती. त्यांच्या त्रासाला सर्वजन कंटाळ केले होते. जयवंतरावांना ही बातमी समजताच आष्टी या गावी धावून गेले. त्यांनी जलालखान या रोहिल्याला आ" टी या गांवात कोंडित पकडले. शेवटी जलालखनाने जयवंतरावापुढे शरणागती पत्करली. शत्रू हे शत्रूच असतात हे जयवंतराव ओळखून होते. त्यांनी जलालखानला क्षमा केली नाही. त्यास सर्वासमक्ष आष्टी गावाच्या भर चौकात जुलमी खंडणी वसूल करण्या—या नराधामास ठार मारले. हे राज्य आमचे आहे, हे सिध्द करुन दाखविले. जलालखानास भर चौकात सर्वासमक्ष ठार मारल्यामुळे जयवंतरावांची किर्ती सर्वत्र पसरली जयवंतरावाच्या धाडसीपणांचा परिचय संपूर्ण पंचक्रोशितील जनतेला झाला. जयवंतरावांचे नाव निजामापर्यंत पोहचले. वायपना आणि भोवतालच्या परिसर जयवंतरावांनी हस्तगत केल्याची माहिती निजामाला कळाली. निजामानी जयवंतरावाची धसकी घेतली होती. जयवंतरावाचा प्रभाव वाढल्यास त्यांना आटोक्यात आणणे अवघड होईल. यासाठी निजामांनी जयवंतरावांना पकडण्यासाठी पंधरा हजाराचे बक्षीस जाहीर केले. परंतु जयवंतरावाना पकडण्याचे धाडस कोणीही करु शकले नाही. तेंव्हा निजामाने जयवंतरावाच्या बदोबस्त करण्यासाठी खास मिल्ट्री पाठविण्यात आली परंतु जयवंतराव ल" करांच्या हाती लागले नाहीत. त्यामुळे निजामाने जयवंतरावाची सर्व जमीन कुळ लागल्याचे जाहीर, करुन या परिसराचा कारभा मुधोळ येथून चालत असल्यामुळे मुधोळ तालुक्याच्या कार्टाचा बेलीफ शेतावर कब्जा सांगणारा कोर्टाचा हूकुम घेउन वायपना गावी आला. जयवंतरावाने मोठया धाडसीवृत्तीने निजामाचा वकील व त्यांच्या एकाही व्यक्तीस जिवंत वापस जाउ देणार नाही अशी धमकी दिली. त्याचे धाडस पाहून आल्या पावलाने बेलीफ वापस गेला. या घटनेमुळे जयवंतरावाची किर्ती सर्वदूर पसरली.

**झेंडा व जंगल सत्याग्रह**

निजामाने आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे जाहीर केले. त्यामुळे स्टेट कॉंग्रेसने स्वामी रामानंद तीर्थाच्या नेतृत्वाखाली पुन्हा स्वातंत्र लढयाला सुरुवात केली. त्यांनी आता कायदेभंगाच्या चळवळीला सुरुवात केली.

7 ऑगस्ट 1947 हा दिवस संघराज्यात विलीन होण्याचा तीन आणि 15 ऑगस्ट 1947 हा दिवस भारतीय स्वातंत्र दिन साजरा करण्याचा दिन स्टेट कॉंग्रेसने ठरविले. तसेच या दिवशी भारताचा तिरंगा ध्वज फडकावून सत्याग्रह करण्यात येणार होता. राज्यात भारतीय ध्वज फडकावणे ध्वज हातात घेउन प्रभात फे—या काढणे, ध्वजास सलामी देण्याचे कार्यक्रम करावेत असे स्टेट कॉंग्रेसने जनतेला आव्हान केले. या आहवानाला जनतेने मोठा प्रतिसाद दिला. निजाम सरकारची बंदी असूनही मराठवाडयातील गावागावांत झेंडा सत्याग्रह करण्यात आला. अशावेळी सत्याग्रहानी पोलीस व रझाकारांच्या अन्याय व अत्याचाराची पर्वा केली नाही. स्टेट कॉंग्रेसच्या आदेशानुसार हादगांव तालुक्यात ठिकठिकाणी झेंडा सत्याग्रहाचे आयोजन केले जात होते. कोळेगाव येथे जुलै 1947 मध्ये कोळेगांवच्या आजुबाजुला वायपना, कंजारा, डोरली, पाथरड, तळेगांव, वाळकी, आष्टी तामसा, कोळी, कोपरा, सोनारी, निवघा पाटनूर, चांभरा, या गावातील लोक बन्सीलाल तोष्णीवाल आप्पासाहेब लहानकर, माणिक लिंगमपल्ले, साहेबराव बारडकर, नागनाथ परांजपे, यांच्या समावेत जयवंतराव पाटील कोळगांव येथे शेकडोच्या समुदायात उतरले. या ठिकाणी ठरल्याप्रमाणे गांवाच्या चावडीवर तिरंगा झेंडा फडकविण्यात आला. तेवढयात हादगांव पोलीस स्टेशनचे अमीन साहेब पोलीस दलाच्या तुकडीसह घटनास्थळी पोहचले. त्यावेळी सत्याग्रहीनी अमीन साहेबांना घेराव घालून तिरंगा झेंडयास सलाम करण्यास भाग पाडले. सत्याग्रही पुढे काही न जमल्यामुळे अमीनसाहब आलेल्या तुकडीसह निघून गेले. तसेच ठरल्याप्रमाणे जंगलसत्याग्रह पार पडला. जंगल

सत्याग्रहात प्रामुख्याने शिंदीचीच झाडे तोडण्यात आली. या जंगल सत्याग्रह जयंवतराव आपल्या शेकडो सत्याग्रही समवेत उतरले होते. त्यांनी हजारो शिंदीची झाडे तोडून निजाम सरकारचा निषेध केला. कामारी आणि तामसा येथील सरकारी गोदामाच्या लुटीत महत्वाची भूमिका निभावली आणि अन्नधान्य गोरगरीब जनतेला वाटले. तशा प्रकारे जयवंतराव पाटील यांच्या पराक्रमाच्या व धाडसाच्या वार्ता सर्वदूर पसरल्या.

**इस्लापूर ॲक्शन**

हैदराबाद राज्यातील सकारच्या जुलमी राजवटीला लोक कंटाळले होती. रझाकारांच्या अत्याचाराने अनेक गावे भरडली होती. त्यांनी केलेल्या अत्याचाराच्या बातम्या रोज कानावर पडत.

जुलमी अत्याचारांचा बिमोड करायचा तर शस्त्राशिवाय शक्य नाही. असे सत्याग्रहीना वाटू लागले. म्हणून त्यांनी शस्त्रस्त्राचा जमाव करण्यासाठी प्राधान्य दिले. नांदेड जिल्हयातील किनवट तालुक्यात असलेले इस्लापूर येथील ठाण्यात शस्त्राचा साठा असल्याची बातमी समजली शस्त्रसाठा हस्तगत करण्यासाठी 30 जुन 1948 रोजी इस्लापूर ठाण्यावर हल्ला करण्याचा निर्णय घेतला. जयवंतराव अशा संधीची वाट पाहत होते. आतपार्यंत त्यांनी एकटयानेच प्रतिकार केला होता. मराठवाडयाला स्वतंत्र करायचे असेल तर आपली शक्ती उमरखेड कॅम्पमधून लावली पाहिजे असे. जयवंतरावाना वाटले. एकांकी उठाव करण्यापेक्षा संघटीत उठाव चांगला. यामूळे निजामाला संघटीत शक्तीपुढे माघार घ्यावी लागेल अशा पध्दतीने उमरखेड कॅम्पची रचना होती. या उमरखेउ कॅम्पमध्ये जयवंतराव सामील झाले. तेंव्हा ते उमरखेउ येथे राहत होते. कॅम्पमधील प्रशिक्षणाचा त्यांचा फारसा संबंध आला नव्हता. ते नेमबाजीत तरबेज होते. जयवंतराव पाटलांनी इस्लापूर मोहीमेचे नेतृत्व स्वतःकडे घेतले. त्यांच्या सोबत मोहीमेत जानकीलाल राठी, तुकाराम कंजारकर, लखसिंह राठोड, साहेबराव बाडकर, राजणीकर उतरवार, भेर बनकर यांच्यासह 153 सैनिक सहभागी होते. पावसाळयाचे दिवस होते. पहाटे चार ते पाचच्या सुमारास पोलीस स्टेशननवर हल्ला करण्याची योजना आखली होती. पाउस आणि पुरामुळे पोलीस स्टेशनपर्यंत पोहचण्यासाठी उशिर झाला होता. थोडे उजडले होते. त्यामुळे मागारी जावे असे काही सत्याग्रहीने सुचविले. परंतु वीर जयवंतरावांनी माघार घेण्यास नकार दिला. पोलीस स्टेशनवर हल्ला करण्यासाठी चार तुकडया केल्या. ठरल्याप्रमाणे बन्सीलाल तोष्णीवाल यांनी पिन बॉम्ब ठाण्यावर फेकला. परंतु स्फोट झाला नाही. स्फोट झाल्यावर चारही तुकडया एकदम हल्ला करणार होत्या. परंतु दुर्देव आडवे आले. जयवंतराव पाटील हे पोलिस स्टेशनच्या समोरील बाजूने हल्ला करणार होते. त्यांनी गोळया झाडण्यास सुरुवात केली परंतु ठरल्याप्रमाणे इतर तुकडयांनी पोलीस स्टेशनवर हल्ला केला नाही. पळून जाण्यापेक्षा मरण पत्करलेले बरे असे ठरवून त्यांनी निजामी पोलीसावर गोळया झाडण्यास सुरुवात केली. यावेळी ते नऊ रझाकार व पोलिसांशी अत्यंत धैर्याने एकांकी लढत होते. तेवढयात ठाण्यातून आलेल्या गोळीने त्यांचा वेध घेतला आणि जयवंतराव शहीद झाले. त्यांच्या जवळ असलेल्या जानकीलाल आणि तुकाराम कंजारकर हे जयवंतरावांच्या मदतीला धावून आले. परंतु पोलिसांच्या गोळया या दोघांचाही टिकाव लागला नाही. तेही तेथेच शहीद झाले.

**हैदराबाद राज्याला स्वातंत्र्य प्राप्ती 17 सप्टेंबर 1948**

हैदराबाद जनतेने सुरु केली सशस्त्र चळवळ आणि निजाम सरकारच्या अन्याय अत्याचारावर भारत सरकार लक्ष ठेवून होते. भारतीय संघराज्यात निजाम आपले राज्य विलीनकरण्यास तयार होत नसल्यामुळे भारत सरकारला 13 सप्टेंबर 1948 रोजी हैदराबाद राज्यावर पोलीस कारवाई करावी लागली. हैदराबाद राज्यात प्रवेश करुन पोलिस व रझाकांरानी लढाई सुरु केली. सुरुवातीला रझाकारांनी प्रतिकार केला. परंतु त्याचा भारतीय लष्करापुढे निभाव लागला नाही. 17 सप्टेंबर 1948 रोजी निजाम मीर उस्मान अली खान बहादूर यांनी युध्द थांबविण्याची घोषणा केली. अशाप्रकारे केवळ 109 तासात पोलिस कारवाई यशस्वी झाली हैदराबाद राज्य स्वतंत्र झाले अर्थात ते भारतीय संघराज्यात विलीन झाले.

थोडक्यात जयवंतराव पाटील यांच्या अंगात सैनिकी रक्त सळसळत होते, जुलमी राजवट उलथून टाकण्यासाठी त्यांनी जीवाची पर्वा केली नाही. हैदराबाद स्वातंत्र्य लढयात जयवंतराव पाटील यांचे योगदान कोणीच विसरु शकत नाही. त्यांनी हैदराबाद मुक्त संग्रामासाठी केलेला त्याग, पुढील पिढयांना प्रेरणादायी राहील.

**संदर्भ सुची**

1. भालेराव अनंत, हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मुंबई मौज प्रकाशन ग्रह व्दि.आ.2001.
2. पोतदार वसंत हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम आव्हाकासार, व्दि. आ. 1984.
3. डॉ. किशन केंद्रे, हैदराबाद संस्थान आणि म. गाधीजी, कंधार पुनम प्रकाशन, 2009.
4. डॉ. कठारे अनिल व डॉ. नगराळे एन.एन. मराठवाडयाचा इतिहास, नांदेड, कल्पना प्रकाशन 1999.
5. अंजनीकर भगवान, वीर पुरुष हू. जयवंतराव पाटील, निर्मल प्रकाशन नांदेड मार्च 2006.

6. ताडेवाड राज हैदराबाद मुक्ती संग्रामातील हादगांव, निर्मल प्रकाशन नांदेड.
7. नरहर कुरुंदकर संपा. जोशी द.पा. हैदराबाद विमोचन आणि विसर्जन, औरंगाबाद, रजत प्रकाशन 1998.
8. देउळगावंकर वि.पा. (सं.पा.) स्वामी रामानंद तीर्थ यांची दैनदिनी, मुंबई, म.रा.सा. आणि सं. मंडळ, 2001.
9. डॉ. अनिल कठारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हैदराबादच्या स्वातंत्र्य संग्राम, नांदेड कल्पना प्रकाशन,1999.